www.pudhari.com

स्थापना १९३९

पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

रायगड

रविवार, २९ जुलै २०१८ । स्थापना वर्षे ८० । मुंबई आवृत्ती वर्ष १० वे। मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, सोल

# दुभंगलेल्या मनांना जोडणारा मनोरुग्णांचा मित्र डॉ. भरत वाटवानी



हेमंत देशमुख, कर्जत

कर्जत पासून जवळच असलेल्या वेणगाव येथे मानसोपचार तज्ज्ञ डॉ. भरत वाटवानी यांनी रस्त्यावर भटकणाऱ्या निराधार मनोरुग्णांवर उपचार करण्यासाठी १९८८ मध्ये श्रद्धा पुनर्वसन केंद सुरु केले. सुरवातीस अवघ्या २० मनोरुग्णांवर उपचार करणाऱ्या केंद्राची व्याप्ती वाढत जाऊन २०१७ पर्यंत देशभरातील ९०४२ मनोरुग्णांवर उपचार करून त्यापैकी ७ हजारापेक्षा जास्त रुग्णांना बरे करून त्यांच्या कुटुंबीयांचा शोध घेऊन त्यांच्या स्वाधीन करण्यात यशस्वी झाले आहेत. त्यांच्या या समाजाप्रती असलेल्या भव्य कार्याची दखल घेऊन त्यांना रेमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर झाला असल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरु आहे.

सुमारे तीस वर्षा पूर्वी डॉ. भरत वाटवानी आणि त्यांची पत्नी यांना एक व्यक्ती वडापाव खाल्ल्यानंतर रस्त्यावर पडलेल्या नारळाच्या करवंटीत नाल्यामधील पाणी पितांना दिसून आला. ते दृश्य पाहून डॉ. भरत वाटवानी यांचे मन हेलावले. त्यांनी त्वरित त्या मनोरुग्णाची भेट घेऊन त्याला स्वत: बरोबर येण्यास राजी केले. आणि त्याच्यावर उपचार करत त्याला सहा महिन्यात बरे केले. आणि तेथूनच त्यांच्या कामाला खऱ्या अर्थाने सुरवात झाली. याच दरम्यान डॉ. भरत वाटवानी यांनी ज्येष्ठ सम ाजसेवक बाबा आमटे यांची आनंदभुवन येथे भेट घ्यायचे ठरवले. आणि ते प्रवासाला निघाले. मात्र आनंदभुवन येथे पोहोचले असता बाबा आमटे हेमलकसा येथे असल्याचे समजले. त्यामुळे डॉ. वाटवानी हे त्याच सायंकाळी पुढच्या प्रवासाला निघाले . त्याच वेळेस रस्त्यात एक साखळ दंड बांधलेला माणूस दिसला. डॉ. वाटवानी यांनी सुरवातीस तशीच गाडी पुढे नेली मात्र नेहमीच दुसऱ्यांच्या सहवेदना जाणून घेणाऱ्या वाटवानी यांनी गाडी परत फिरवून त्या मनोरुग्णाला आपल्या गाडीत बसविले आणि हेमलकसाला गेले. तेथे बाबा आमटे आणि त्यांचा मुलगा प्रकाश आमटे यांची भेट घेतली. आणि बरोबर गाडीत बसवून आणलेल्या मनोरुग्णाचे साखळ दंड तोडून टाकण्यास मदत करावी अशी विनंती केली. त्याला तात्काळ प्रतिसाद देत प्रकाश आमटे यांनी स्वत: छिन्नी हातोडा घेऊन ते साखळ दंड तोडले. त्यानंतर सर्व झोपी गेले.

सकाळी वाटवानी पहाटे उठवल्यावर बघतात तर काय बाबा आमटे हे रडताना दिसून आले. ते पाहून वाटवानी गहिवरले आणि त्यांना या मागचे कारण विचारले असता बाबा म्हणाले की हा समाज किती निर्दयी आहे. एक माणूस दुसऱ्या माणसाला असा कसा वागवू शकतो. तरी तुम्ही यासाठी काहीतरी नक्की करा.

> डॉ. बाबा आणि प्रकाश आमटे यांच्या पासून खरी प्रेरणा मिळाली. आमच्या कार्याची दखल घेऊन जो रेमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर झाला यामुळे आमची काम करण्याची शक्ती अधिकच वाढण्यास मदतच झाली आहे. लोकांनी मनोरुग्णांना मानसोपचार तज्ज्ञांकडे उपचार करण्यासाठी न्यावे. करणी, जादूटोणा, भगत अंधश्रद्धा पासून दूर राहावे.
>
> **-डॉ . भरत वाटवानी, मानसोपचार तज्ज्ञ, रेमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त**

त्यांच्या या वाक्याने भारावलेले वाटवानी यांनी यातून प्रेरणा घेऊन कर्जत वेणगाव येथे १९८८ मध्ये श्रद्धा पुनर्वसन केंद्र उभारले.

मनोरुग्ण होण्या मागची अनेक कारणे आहेत. जीवनात येणारे अपयश, नात्यांमधील विरह अथवा एखाद्या भूमिकेत स्वत: ला बघणे, समरस होणे आणि स्वत:च्या वास्तववादी जीवनाचा विसर पडणे असे मनोरुग्णांचे प्रकार आहेत. या मनोरुग्णांना त्या काळात कुटुंबीयांचा हवे तसा आधार मिळत नाही. लोकांचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोनही चुकीचा असल्याने या मनोरुग्णांवर त्याचा अधिकच विपरीत होतो असे हे रुग्ण अचानक कुटुंबातून बाहेर पडतात. तर काहींना नातेवाईकच घराबाहेर सोडून देतात. आणि तेथूनच या मनोरुग्णांच्या आयुष्याची फरफट सुरु होते. अशा या रस्त्यावर फिरणाऱ्या मनोरुग्णांना डॉ. वाटवानी यांचे पुनर्वसन केंद्रातील कर्मचारी त्याच्या खास गाडीतून केंद्रात आणतात. त्यांची स्वच्छता करतात. आणि त्यानंतर डॉ. वाटवानी या मनोरुग्णांना जाणून घेऊन त्यांच्या वेदना समजून घेतात. आणि योग्य उपचार करतात. यातील काही रुग्ण दहा बारा महिन्यात बरे होतात. तर काहींना बरे व्हायला अनेक वर्ष लागतात.

त्यानंतर बरे झालेल्या रुग्णांच्या घरचे पत्ते शोधून त्यांना त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात येते. यावेळेस काही विचित्र अनुभव तर काही मन हेलावणाऱ्या प्रसंगांना श्रद्धा फाऊंडेन्शनच्या कर्मचाऱ्यांना सामोरे जावे लागते. काही कुटुंबे या रुग्णांनाची जबाबदारी घेण्यास नकार देतात तर काही कुटुंबियांना अचानक आपल्या पासून अनेक वर्षांपूर्वी आपला हरविलेला माणूस परत मि ळतो हे पाहून अश्रूंचा बांध फुटतो शब्दच फुटत नाही. हे पाहून श्रद्धा पुनर्वसन केंद्राचे कर्मचारीही हेलावून जातात. मात्र आलेल्या प्रसंगांना सामोरे जात यातील चांगल्या गोष्टीतुन प्रेरणा घेऊन हे या केंद्रांचे काम अखंडित सुरु आहे. त्यामुळेच डॉ. भरत वाटवानी रेमन मॅगसेसे पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.